RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013–15

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक ६०] सोमवार, सप्टेंबर ३०, २०१३/आश्विन ८, शके १९३५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २५.००

### असाधारण क्रमांक ११९

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### विधी व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ सप्टेंबर २०१३.

### अधिसूचना

**भारतीय भागिदारी अधिनियम, १९३२.**

क्रमांक आयपीए. २०१२/३२९/प्र.क्र. ५९/का.-१.— महाराष्ट्र राज्यात लागू असेल याबाबतीत भारतीय भागिदारी अधिनियम, १९३२ (१९३२ चा ९) कलम ७१ च्या पोट-कलम (१) व (२) व कलम ७०अ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि महाराष्ट्र भागिदारी नियम, १९८९ मध्ये सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेल्या पुढील अधिसूचनेचा मसुदा त्याद्वारे बाधीत होणाऱ्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता उक्त अधिनियमाच्या कलम ७१ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे प्रसिद्ध करीत आहे ; आणि याद्वारे उक्त मसुद्याची देण्यात आलेली सूचना महाराष्ट्र शासनाकडून दिनांक २५ ऑक्टोबर २०१३ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उपरोक्त दिनांकापूर्वी, उक्त मसुद्याच्या संबंधात, कोणत्याही व्यक्तीकडून, महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना प्राप्त झालेले कोणतेही आक्षेप किंवा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### अधिसूचनेचा मसुदा

क्रमांक आयपीए. २०१२/३२९/प्र.क्र. ५९/का.-१.— महाराष्ट्र राज्यात लागू असेल याबाबतीत भारतीय भागिदारी अधिनियम, १९३२ (१९३२ चा ९) कलम ७१ च्या पोट-कलम (१) व (२) व कलम ७०अ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि उक्त अधिनियमाच्या कलम ७१ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, महाराष्ट्र भागिदारी नियम, १९८९ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र भागिदारी (सुधारणा) नियम, २०१३ असे म्हणावे.



www.taxguru.in

२. महाराष्ट्र भागिदारी नियम, १९८९ याच्या नियम १९ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

"१९. कागदपत्रांच्या किंवा अधिनियमांच्या संबंधात देय असलेली फी.— कागदपत्रांच्या किंवा अधिनियमाच्या संबंधात भागिदारी संस्थेच्या निबंधकाकडे भरावयाची फी पुढीलप्रमाणे असेल :—

| | |
|---|---|
| (१) कलम ५८ (१) खालील विवरणपत्र | रुपये एक हजार पाचशे |
| (२) कलम ५८ (४) खालील अपीलाचे ज्ञापन | रुपये एक हजार |
| (३) कलम ६० (१) खालील विवरणपत्र | रुपये एक हजार |
| (४) कलम ६१ खालील सूचना | रुपये एक हजार |
| (५) कलम ६२ खालील सूचना | रुपये एक हजार |
| (६) नोटीस कलम ६३ (१) खालील नोटीस | रुपये एक हजार |
| (७) कलम ६३ (१-अ) खालील सूचना | रुपये एक हजार |
| (८) कलम ६३ (२) खालील नोटीस | रुपये एक हजार |
| (९) कलम ६४ (२) खालील अर्ज | रुपये एक हजार |
| (१०) भागीदारी संस्थांच्या नोंदवहीच्या एका खंडाच्या तपासणीसाठी कलम ६६ च्या पोट-कलम (१) अन्वये भागिदारी संस्थेच्या नोंदवहीची तपासणी. | रुपये शंभर |
| (११) एका भागीदारी संस्थेच्या संबंधातील सर्व कागदपत्रांच्या तपासणीसाठी कलम ६६ च्या पोट-कलम (२) अन्वये भागिदारी संस्थेच्या संबंधातील कागदपत्रांची तपासणी. | रुपये शंभर |
| (१२) प्रत्येक १०० शब्दांसाठी किंवा त्याच्या भागासाठी कलम ६७ अन्वये नोंदवहीतील प्रती | रुपये शंभर |
| (१३) नियमान्वये विहित केलेल्या नमुन्याची किंमत | रुपये पन्नास.". |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वी. ग्या. बिष्ट,**
शासनाचे विधी सल्लागार-*नि*-सहसचिव.

www.taxguru.in

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 25th September 2013.

### *NOTIFICATION*

INDIAN PARTNERSHIP ACT, 1932.

No. IPA. 2012/329/CR 59/Desk-1.—The following draft of rules further to amend the Maharashtra Partnership Rules, 1989, which the Government of Maharashtra proposes to issue in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 71 read with section 70A of the Indian Partnership Act, 1932 (IX of 1932), in its application to the State of Maharashtra, is hereby published as required by sub-section (*3*) of section 71 of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby ; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 25th October 2013.

2. Any objections or suggestions which may be received by the Principal Secretary and R. L. A. to the Government of Maharashtra, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Law and Judiciary Department, Mantralaya, Mumbai 400 032 from any person with respect to the said draft before the aforesaid date, will be taken into consideration by the Government.

### *DRAFT NOTIFICATION*

No. IPA. 2012/329/CR-59/Desk-1.—In exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 71 read with section 70A of the Indian Partnership Act, 1932 (IX of 1932), in its application to the State of Maharashtra, the Government of Maharashtra hereby amends the Maharashtra Partnership Rules, 1989, the same having been previously published as required by sub-section (*3*) of section 71 of the said Act, as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Partnership (Amendment), Rules, 2013.

2. For rule 19 of the Maharashtra Partnership Rules, 1989, the following rule shall be substituted, namely :—

" 19. *Fee payable in respect of document or act.*—The fees to be paid to the Registrar of Firms in respect of document or act shall be as follows, namely :—

| | |
|---|---|
| (1) Statement under section 58 (*1*) | One thousand five hundred rupees. |
| (2) Memorandum of appeal under section 58 (*4*) | One thousand rupees |
| (3) Statement under section 60 (*1*) | One thousand rupees |
| (4) Intimation under section 61 | One thousand rupees |
| (5) Intimation under section 62 | One thousand rupees |
| (6) Notice under section 63 (*1*) | One thousand rupees |
| (7) Intimation under section 63 (*1 A*) | One thousand rupees |
| (8) Notice under section 63 (*2*) | One thousand rupees |
| (9) Application under section 64 (*2*) | One thousand rupees |
| (10) Inspection of the Register of firms under sub-section (*1*) of section 66, for the inspection of one volume of the Register of Firms. | One hundred rupees |

www.taxguru.in

| | |
|---|---|
| (11) Inspection of documents relating to a firms under sub-section (2) of section 66, for the inspection of all documents relating to one firm. | One hundred rupees |
| (12) Copies from the Register under section 67, for each hundred words or part thereof. | One hundred rupees |
| (13) Price of forms prescribed under the rules | Fifty rupees.". |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. G. BISHT,
Legal Advisor-*cum*-Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

www.taxguru.in